# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.लेखा/३९/कावि/२३/२०२५

दिनांक - ०६/०१/२०२५

**परिपत्रक**

**विषय–(Electronic Clearance Servic) ईसीएस रजिस्ट्रेशन बाबत...**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे सर्व देयकांची अदायगी ही ईसीएस द्वारे बॅंकेमार्फत केली जाते. हे करीत असताना असे निदर्शनास आले आहे, की विविध विभागामार्फत ईसीएस रजिस्ट्रेशन करित असताना संबधीत कर्मचा-यांकडून ईसीएस रजिस्ट्रेशन लेखा विभागाकडील संगणक प्रणालमी मध्ये करीत असताना अनेक चुका झालेले निदर्शनास आल्या आहेत. त्यामूळे सदरच्या देयकांची अदायगी करताना बॅंकाना वारंवार अडचणी निर्माण होत आहे. ईसीएस रजिस्ट्रेशन करीत असताना बॅंकेचे नाव, बॅंकेचा खाते क्रमांक व बॅंकेच्या शाखेता पत्ता तसेच बॅंकेचा आयएफसी कोड इ. माहीती बॅंकेच्या पासबूक किंवा धनादेशावरील ईसीएस ची आवश्यक असणारी माहीतीची पडताळनी करुन तसेच खात्री करुनच ईसीएस रजिस्ट्रेशन कण्यात यावे. सदर रजिस्ट्रेशन करीत असताना आयएफसी कोड किंवा खाते क्रमांक मध्ये झीरो च्या एवजी ओ टाईप केला जोतो. तसेच खाते क्रमांकाची नोंद व आयएफसी कोड चे संकलन करीत असताना शुन्य च्या एवजी झीरो टाईप केला जातो तसेच आयएफसी कोड किंवा खाते क्रमांक संकलन करीत असताना पुढील अथवा मधील बाजूस किंवा शेवटच्या बाजूस स्पेस दिला जातो त्यामुळे बॅंकेकडून पेमेंट करीत असताना पेमेंट रिजेक्ट केले जाते.

तरी सर्व कर्मचा-यांना / विभागांना सुचीत करणेत येत आहे, की आपण ईसीएस रजिस्ट्रेशन करित असताना अचूक व काळजीपूर्वक रजिस्ट्रेशन करणेत यावे. तसेच नियंत्रण अधिकारी यांनी संबधीत कर्मचारी यांनी केलेले रजिस्ट्रेशन योग्य असल्याची खातरजमा करावी. तसेच देयकाच्या दाखल्या मध्ये नियंत्रण अधिकारी यांनी ईसीएस रजिस्ट्रेशन तपासले असून योग्य असल्याबाबत दाखला देणेत यावा. विभागाने ईसीएस मध्ये माहीती संकलन करीत असताना ती अचूक असल्याची खात्रीकरुन मगच संकलीत करणेत यावी. तसेच चुकीचे ईसीएस रजिस्ट्रेशन केल्यामुळे अडचण निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही संबधीत कर्मचारी यांची राहिल याची नोंद घेण्यात यावी. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबधीतांनी घेणेत यावी तसेच अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावी.

शेखर सिंह

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका